निविदा/कोटेशन

जा क्र. /म.सं.के./ता./भा.दर / 23 /२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला
दि. 10/04/2023

प्रति,

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

विषय :- सन २०२३ - २०२४ करिता भाडे तत्वावरील खाजगी ट्रॅक्टरने/बैल जोडीने मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे. कृ.वि. अकोला येथील प्रक्षेत्रावर शेतीची विविध कामे करण्यासाठी दर मागविणे बाबत.

महोदय ,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत विविध विभागाच्या प्रक्षेत्रावर ट्रॅक्टर च्या सहाय्याने शेतीची विविध कामे करण्याकरिता इच्छुक ट्रॅक्टर धारक / बैलजोडी धारका कडुन प्रति हेक्टर प्रमाणे खालील तक्त्यानुसार दर मागविण्यात येत आहे.

**अ. सन २०२३- २०२४ करिता खाजगी तत्वावर भाड्याच्या ट्रॅक्टरने शेतीची विविध कामे करण्याकरिता दराचे विवरण**

| अ. क्र. | कामाचे विवरण | प्रकार | प्रति हेक्टरी दर रूपये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | नांगरटी | २ फाळी | |
| २ | नागरटी | ३ फाळी | |
| ३ | पंजीवाही | ५ फाळी | |
| ४ | फंटावाही | ९ फाळी | |
| ५ | पासावाही | ३ पासा | |
| ६ | पट्टीपास (जांभुळवाही) | एकपास | |
| ७ | रोटावेटर | ५ फुट | |
| ८ | पेरणी पट्टीपाससहीत | ट्रॅक्टर पेरणी यंत्राने | |
| ९ | पेरणी बिनापट्टीपासासह | ट्रॅक्टर पेरणी यंत्राने | |
| १० | फवारणी | ट्रॅक्टर बुमने | |
| ११ | फवारणी | पावर पप/पेट्रोल पंप | |
| १२ | फवारणी | उंच पिकाकरिता (High Clearance Boom Spray) | |
| १३ | डवरणी | ट्रॅक्टर व दोन ओळीतील अंतर | |
| | अ.डवरणी | ४५ से.मी. | |
| | आ..डवरणी | ६० से.मी. | |
| | इ.डवरणी | ९० से.मी. | |
| | ई.डवरणी | १२० से.मी. | |
| १४ | मळणी/ थ्रेशर यंत्राव्दरे | तुर | प्रति किंटल |
| | | सोयाबिन | प्रति किंटल |
| | | उडीद | प्रति किंटल |
| | | मुग | प्रति किंटल |
| | | ज्वारी | प्रति किंटल |
| | | करडी | प्रति किंटल |
| | | हरबरा | प्रति किंटल |
| | | गहु | प्रति किंटल |

**ब. सन २०२३- २०२४ करिता खाजगी तत्वावर भाड्याच्या बैल जोडीने शेतीची विविध कामे करण्याकरिता दराचे विवरण**

| अ. क्र. | कामाचे विवरण | प्रकार | प्रति हेक्टरी दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | पेरणी संचः ज्युट पिक पेरणी | चाड्यासह तिफन + 1 बैलजोडी + पुरुष मजूर, तिफनकरी + उनारी | |
| 2 | पेरणी संचः भाड्याने तिळ, उडीद, मुंग, पेरणी करीता | 1 चाड्यासह तिफन + 3 बैलजोडी + 4 पुरुष मजूर, 1 तिफनकरी, 1 उनारी + 2 वखर धारय करणे | |
| 3 | पेरणी संचः सरत्याने तीळ, उडीद, कापुस, ढेंचा, मुंग, सोयाबिन, ज्वार पेरणी करीता | 1 तिफन + 2 वखर + 3 बैलजोडी + 3 पुरुष मजूर + 3 स्त्रीया मजूर | ... |
| 4 | काकर /चौफुली पाडणे अ) 2 फुट अंतर करीता | 1 बैलजोडी + 1 तिसा अवजार + 1 पुरुष मजूर | |
| 5 | डवरणी (आंतर मशागत) | 1 बैलजोडी + 2 डवरे + 2 पुरुष मजूर | |
| 6 | वखर, डुबे (आंतर मशागत) | 1 बैलजोडी + 1 वखर किंवा डुबा + 1 पुरुष मजूर | |

सदर कामे करण्याकरिता सविस्तर अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत. दर सादर करतेवेळी पाकीटावर मालकाचं नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इ. चा स्पष्ट उल्लेख केलेला असावा. तरी इच्छुक मालकांनी उपरोक्त प्रमाणे दर तक्त्याच्या रुपात या कार्यालयाला दि. २५/०४/२०२३ कार्यालयीन वेळेपर्यंत बंद लिफाप्यामध्ये स्पष्ट , सुटसुटित अक्षरात सादर करावेत. आवश्यक सर्व अटी पुर्ण करणा-या मालकाचाच विचार करण्यात येईल याची कृपाय नोंद घ्यावी.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला

<u>अटी व शर्ती</u>

१. विभागावर काम करतांना काम समाधानकारक झाल्याची खात्री झाल्यानंतरच देयक काढण्यात येईल.
२. ट्रॅक्टर व सोबतची अवजारे चांगल्या स्थितीत असावेत.
३. ट्रॅक्टरची सर्व कामे ही कार्यालयीन वेळेतच करुन घेण्यात येईल.
४. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.
५. विभागावर देण्यात आलेले काम पुर्ण करावे लागेल, अर्धवट काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
६. विभागावरील कोणताही वाद विवाद झाल्यास त्याबाबतचा अंतीम निर्णय संचालक, म.सं.के. यांचा राहील व तो सर्वांना बंधनकारक राहील.
७. ट्रॅक्टरची कामे करत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान, जिवित हाणीस व अपघातास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी ट्रॅक्टर मालकाची राहील.
८. ट्रॅक्टरची कामे करत असतांना विद्यापीठाच्या मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी घ्यावी. होणा-या नुकसानीस सर्वस्व ट्रॅक्टर मालकास जबाबदार धरण्यात येईल. व नुकसान भरपाई करुन घेण्यात येईल.
९. निवीदा व कोटेशन सादर करतांना दराचा स्पष्ट उल्लेख असावा. खोडतोड असलेली निवीदा/कोटेशन रद्द ठरवण्यात येईल.
१०. कार्यालयीन पध्दतीप्रमाणे समाधानकारक कामाचे देयक वरीष्ठ कार्यालयाकडुन मंजूर झाल्यावरच आपल्याला दिले जाईल. त्यामुळे वारंवार विचारणा करु नये.
११. इच्छुक मालकांनी निवीदा /कोटेशन सादर करते वेळेस ज्या व्यकतीच्या नांवे ट्रॅक्टर असेल त्याच ट्रॅक्टरची आर सी बुक छायांकित प्रत/झेरॉकस देणे आवश्यक राहील . तसेच देयकाचे भुगतान आर सी बुकवर जे नांव असेल त्याच नावाने देयक काढण्यात येईल .
१२. ट्रॅक्टरची कामे करत असतांना विद्यापीठाच्या मार्फत कोणत्याही प्रकारचे इंधन /दुरुस्ती, ट्रॅक्टर चलीत साहित्य मिळणार नाही.
१३. तरी वरील सर्व अटी मान्य असणा-या ट्रॅक्टर धारकांनी नमूद कामाच्या निविदा सादर कराव्यात.